# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ४१५-२०२४** **दिनांक-०८/११/२०२४**

## " गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या अड्ड्यावर छापा टाकुन लाखोचा मुद्देमाल नष्ट करण्यात गुन्हे शाखा कक्ष -३ विरार यांना यश "

------///------

दि. ०७/११/२०२४ रोजी सकाळी ०८.०५ वा. चे सुमारास गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने गुन्हे शाखा कक्ष -३ च्या पथकाला माहिती मिळाली की, विरार पुर्व बरफ पाडा खिंड लगतच्या जंगलातील डोंगर परिसरात बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टी दारु तयार होत आहे. सदर गोपनीय बातमीवरुन विरार पुर्व बरफ पाडा खिंड हद्दीतील जंगलातील डोंगर परिसरात छापा घालुन करण्यात आलेल्या कारवाई मध्ये १,११,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला त्यात १) ३००० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश. २) ६० लिटर गावठी हातभट्टीची दारु व गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने मिळुन आले असुन महिला आरोपीत विरुध्द पो.हवा/ ०७०९३ सागर सखाराम बारवकर नेमणुक - गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी सरकारतर्फे विरार पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली असुन सदर बाबत विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७७३/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (फ), (ई) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, पोहवा/मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, तुषार दळवी, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ विरार यांनी पार पाडली आहे.

-------ooooo-------